*Annexure IX (10), (Vide Article - 9.01 (xii))*

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय
"वन भवन" रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
दूरध्वनी २५४९५६३ ई-मेल - pccfwl_ngp@sancharnet.in

विषय - दिनांक ३ नोव्हेंबर २००६ रोजी संरक्षित क्षेत्राचे ५ कि.मी. आंत मधील पाळीव जनावरांना लसीकरण करण्याबाबत वन सभागृह, सेमीनरी हिल, नागपूर येथे संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत

क्रमांक - कक्ष-२३ (३)/ 3009 /२००६-०७
नागपूर-४४० ००१, दिनांक 9४ नोव्हेंबर २००६

प्रति,

(१) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर
(२) मुख्य वनसंरक्षक, नागपूर वनवृत्त, नागपूर
(३) मुख्य वनसंरक्षक, अमरावती वनवृत्त, अमरावती
(४) मुख्य वनसंरक्षक, यवतमाळ वनवृत्त, यवतमाळ
(५) वनसंरक्षक, उत्तर चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर
(६) वनसंरक्षक, दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर
(७) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
(८) सहआयुक्त, पशु चिकित्सालय, महाराजा बाग समोर, नागपूर

दिनांक ३ नोव्हेंबर २००६ रोजी संरक्षित क्षेत्राचे ५ कि.मी. आंत मधील पाळीव जनावरांना लसीकरण करण्याबाबत, वन सभागृह, सेमीनरी हिल, नागपूर येथे संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्त आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडलेले आहे. त्याचप्रमाणे वरील सभेचे कार्यवृत्तांत सर्व अधिका-यांनी आपआपल्या अधिनस्थ कार्यालयांना त्यांचे स्तरावर निर्गमित करावे.

सहपत्र - वरिलप्रमाणे

प्र. मु. व. सं. (व. जी.) म रा नागपूर यांचे करून मान्य अनुमोदित

(बि. मजुमदार)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलिपी श्री विजयकुमार, आयुक्त, पशूसंवर्धन विभाग,म.रा.पुणे यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित

D:\OFFICE\Lanjewar 23-3\Meeting 3-11-2006\Vaccination to cattle in PA.doc

दिनांक ३ नोव्हेंबर २००६ रोजी संरक्षित क्षेत्राचे ५ कि.मी. आंत मधील पाळीव जनावरांना लसीकरण करण्याबाबत संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्तांत

संरक्षित क्षेत्राचे ५ कि.मी. आतमधील पाळीव जनावरांना लसीकरण करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक,(वन्यजीव)) म.रा. नागपूर व डॉ. विजयकुमार, आयुक्त, पशू संवर्धन, म.रा.पुणे यांचे अध्यक्षतेखाली प्रमुख उपस्थितीत आढावा सभा, वनसभागृह, सेमीनरी हिल्स, नागपूर येथे दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ रोजी दुपारी ३.३० वाजता घेण्यात आली. या सभेत सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद असलेले अधिकारी उपस्थित होते.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर यांनी सदर सभेला उपस्थित सर्व अधिका-याचे स्वागत करुन लसीकरणाच्या आवश्यकतेबाबत प्राथमिक माहिती दिली. त्यानंतर श्री विजयकुमार, आयुक्त, पशू संवर्धन विभाग, म.रा.पुणे यांनी सांगितले की, रिंडर पेस्ट (Rinder Pest) सारखे काही आजार हे नाहीसे झालेले आहेत. परंतु असे काही आजार असल्यास त्याबाबत सर्वेक्षण करुन त्याचा संपुर्ण नायनाट करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यानंतर विदर्भातील सर्व क्षेत्राच्या संदर्भात लसीकरण किती प्रतिशत झाले याचा आढावा घेण्यात आला. सदर कार्यक्रम राबवितांना येणा-या अडचणी सबंधीतांना सांगितल्या. सभेमध्ये खालील आजारांचे लसीकरण करणे आवश्यक असल्याचे ठरविण्यात आले.

१) तोंडखुरी (Foot and Mouth Disease)

२) आंत्रविषार (Entero Toxaemia Vaccine)

३) एकटांग्या (Black Quarter Vaccine)

४) घटसर्प (Heamorrhagic Septicaemia)

या संदर्भात आयुक्त, पशू संवर्धन विभाग, म.रा.पुणे यांनी खालील सूचना दिल्या.

१) संरक्षित क्षेत्राच्या ५ कि.मी. क्षेत्राच्या आंतील सर्व गावांची यादी वन अधिका-यांनी पशू संवर्धन खात्याच्या संबंधीत अधिका-यांना उपलब्ध करुन द्यावी. पशू संवर्धन विभागातील अधिका-यांनी सदर गावामध्ये असलेल्या जनावरांच्या संख्येची माहिती गोळा करावी.

D: OFFICE Lanjewar\23(3)\Meeting 3 Nov 2006 on Vaccination to cattle in PA.doc

२)	त्यानुसार किती लस लागेल व विविध आजारासाठी कोणत्या कालावधीत लस लागेल यांचाही वेळापत्रक तयार करावा.

३)	वरिल प्रमाणे लागणा-या लसीसाठी किती अनुदान लागेल याबाबत मागणी त्यांचेकडे करावी.

४)	साधारणतः रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यानंतर त्यानुसार लसीकरणाचा कार्यक्रम हाती न घेता योग्य कालावधीत लसीकरण पूर्ण करण्याचे उद्यिष्ट ठेवण्यात यावे.

५)	संरक्षित क्षेत्राच्या परिसरातील लोकांना वन्यजीवांचे महत्व तसेच पाळीव जनावरांमध्ये लसीकरणाचे महत्व समजाविण्यासाठी पोस्टर, पॉम्पलेट द्वारे प्रसिध्दी देण्यात यावी.

६)	लसीची उपलब्धता पशुसंवर्धन खात्यामार्फत करण्यात येईल. तसेच शीतसाखळीची (Cold Chain) व्यवस्था सुध्दा पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात येईल.

७)	लसीकरणाकरिता लागणारे शासकीय शुल्क रुपये १/ प्रती जनावर प्रती लस हे वनखात्यातर्फे देण्यात येईल.

८)	दुर्गम व आतील गावांमध्ये लसीकरण करण्यासाठी पशू संवर्धन विभागाकडून मागणी असल्यास वन विभागाकडून वाहनाची व्यवस्था करण्यात येईल.

त्यानंतर प्रधान मुख्य वनसंरक्षक,(वन्यजीव) म.रा. नागपूर यांनी नागपूर व अमरावती भागामध्ये बर्ड फ्ल्यूच्या संदर्भात प्रशिक्षण घेण्याबाबत विनंती केली असता आयुक्तांनी सहमती दर्शविली. तसेच पुढील २-३ महिने, मुख्य वनसंरक्षक,(वन्यजीव) नागपूर/वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट, अमरावती यांनी आपआपल्या क्षेत्रातील लसीकरण कार्यक्रमाचा समन्वय साधण्यासाठी पशू संवर्धन विभागाचे अधिका-यासोबत सभा दर महिन्याला घेवून अहवाल देण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर सभेची सांगता करण्यात आली.